# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणामार्फत सुरु असलेल्या मेट्रोमार्ग-५ ठाणे-भिवंडी-कल्याण) मार्गालगतच्या जागेवरील बांधकामाबाबत

**(१) १२३ (०६-०४-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणामार्फत सुरु असलेल्या मेट्रोमार्ग-५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) मार्गालगतच्या जागेवरील बांधकामासाठी एमएमआरडीएचे नाहरकत प्रमाणपत्र न घेता कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून बांधकाम परवानग्या देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी नगरविकास विभागाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार या बांधकामाच्या परवानग्या रद्द करुन जबाबदार असणाऱ्या दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच केलेल्या कारवाईची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०२०) :** (१), (२) व (३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील मुंबई मेट्रो लाईन-५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) या आखणीच्या लगत बांधकाम परवानगी प्रदान करतांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून ना-हरकत दाखला प्राप्त करून घेणेबाबत एमएमआरडीएने दि.२०.१२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविले आहे.

• सदर मेट्रो लाईनच्या आखणीची अधिसूचना केंद्र शासनाच्या राजपत्रामध्ये दि. २६.०६.२०१९ रोजी प्रसिध्द झालेली असून त्यानंतर मेट्रो लाईनच्या आखणी लगत कोणतीही बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.

• दि.२०.१२.२०१६ रोजीच्या पत्रानंतर मेट्रो लाईनच्या आखणी लगत ०३ नवीन व ०५ सुधारीत बांधकाम परवानग्या शासन मंजूर नियंत्रण नियमावलीनुसार प्रदान करण्यात आलेल्या आहेत.
• सदर मेट्रो लाईनच्या आखणीलगत धारकांना बांधकाम परवानगीचे अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून ना-हरकत दाखला प्राप्त करणेकरीता दि. ०५.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असून सदर दाखला प्राप्त होईपर्यंत बांधकाम परवानगीस स्थगिती देण्यात आलेली आहे.
• मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे ७ बांधकामांना ना-हरकत दाखले प्राप्त झालेले आहेत.
• मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे दि. २०.१२.२०१६ रोजीचे पत्र वरिष्ठांच्या निदर्शनास न आणणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई सुरू असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालीदेवद (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतून जाणा-या पाईपलाईनवर झालेले अतिक्रमण**

**(२) २७३ (२०-०३-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालीदेवद (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतून जाणा-या नवी मुंबई महानगरपालिकेच्या पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करुन बांधकामे केली असून काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनधिकृत टप-या व दुकाने उभारली असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विभागात पाईपलाईनवर अनधिकृतपणे व्यवसाय करणारे दुकानदार तसेच रहिवाशी आपल्या दैनंदिन पाण्याच्या वापरासाठी अनेक ठिकाणी पाईपलाईनला छिद्र करित असल्यामुळे दररोज लाखो लिटर पाणी वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामांमुळे नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन पुर्णपणे झाकली गेल्यामुळे भविष्यात कोणी पाईपलाईनमध्ये विष प्रयोग केल्यास त्याचा विपरीत परिणाम नागरिकांवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून भविष्यात होणारा धोका टाळण्यासाठी सदर अनधिकृत बांधकामे दूर करून पाणी गळती थांबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-११-२०२०) :** (१) • पालीदेवद (ता.पनवेल, जि.रायगड) या ठिकाणी श्री.आलुराम केणी नामक इसमाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या पिण्याच्या पाईपलाईनवर लोखंडी पत्र्याच्या टपऱ्या व त्यासमोर ओटल्यासह उभारले आहे. सदर अतिक्रमण निष्काषित करण्यास संबंधित ग्रामपंचायतीस नवी मुंबई महानगरपालिकेकडून कळविण्यात आले आहे.

(२), (३) व (४) • पालीदेवद ग्रामपंचायतीस अधिकृत नळजोडणी दिलेली आहे. या पाईपलाईनला छिद्र करीत असल्याने लाखो लिटर पाणी वाया जाते अशी वस्तुस्थिती नाही.

• सदर पाईपलाईन भूमिगत असून त्याच्याभोवती एन्केसिंग करण्यात आले आहे. तसेच या पाईपलाईनअंतर्गत पाण्याचा दाब ५.५ kg/Cm२ ते ६ kg/Cm२ इतका प्रचंड असल्याने त्यामध्ये विष प्रयोग होण्याची शक्यता नाही.

• सदर पाईपलाईनचे काम महानगरपालिकेमार्फत कंत्राटदारास देण्यात आले असून कंत्राटदारातर्फे येथे गस्त घालण्यात येते. त्यामध्ये पाणी-गळती आढळल्यास ती थांबवण्यात येते तसेच पाईपलाईनवर कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम होणार नाही याची दक्षता घेतली जात असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई महानगरपालिकेतील डॉक्टर भरतीला मान्यता मिळण्याबाबत

**(३) ४०८ (०२-०४-२०२०). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या शैक्षणिक व सामाजिक मागासवर्गीय आरक्षण (एसईबीसी) आणि केंद्र शासनाचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्युएस) जाहीर झालेल्या दहा टक्के आरक्षणामुळे नवी मुंबई महानगरपालिकेतील डॉक्टर भरतीला मान्यता मिळाली नसल्यामुळे अपुऱ्या डॉक्टरांअभावी नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील आरोग्य सेवेवर परिणाम होत असून नागरिकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेने डॉक्टरांची कमतरता असल्याने डॉक्टरांची भरती करण्याबाबत नगरविकास विभागाकडे सरळसेवेच्या बिंदूनामावलीचा प्रस्ताव व नोंदवह्या तपासणीसाठी माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पाठविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेची सर्व रूग्णालये पूर्ण क्षमतेने सुरु व्हावीत याकरिता नगरविकास विभागाकडे महानगरपालिकेने पाठविलेल्या सरळसेवेच्या बिंदूनामावलीचा प्रस्तावास व नोंदवह्या तपासणी करून लवकरात लवकर मंजुरी मिळावी म्हणून मा.लोकप्रतिनिधींनी शासनास माहे मे, २०१९ व माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-११-२०२०) :** (१) • राज्य शासनाने सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग (एसईबीसी) वर्गासाठी १३% आरक्षण तसेच केंद्र शासनाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्युएस) १०% आरक्षण जाहिर केलेले आहे.

• तथापि नवी मुंबई महानगरपालिकेच्या रूग्णालयात अपुऱ्या डॉक्टरांमुळे नागरिकांची गैरसोय झाली अशी वस्तुस्थिती नाही.

(२), (३) व (४) • नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाच्या गट-अ मधील १६ संवर्गाच्या बिंदूनामावल्या तपासणी व प्रमाणित करून मिळण्यासाठी दि. १६.०५.२०१९ अन्वये शासनास प्राप्त झाल्या होत्या.

• सदर बिंदुनामावलीचा प्रस्ताव लवकर मंजूर करण्याबाबत दि.२७.०५.२०१९ रोजी मा. लोकप्रतिनिधींचे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे.

• सदर बिंदूनामावली नोंदवह्या सामान्य प्रशासन विभागाकडून तपासून दि. ३०.०८.२०१९ च्या पत्रान्वये नवी मुंबई महानगरपालिकेला पाठविण्यात आलेल्या आहेत.

• तद्नंतर दि. १७.०२.२०२० च्या पत्रान्वये नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील १९ संवर्गाच्या बिंदुनामावल्या तपासणी व प्रमाणित करून देण्यासाठी शासनास प्राप्त झाल्या.

• सामान्य प्रशासन विभागाने १३ एकाकी पदांच्या बिंदुनामावली नोंदवह्या तपासून दिलेल्या असून दि. १५.१०.२०२० रोजीच्या शासन पत्रान्वये नवी मुंबई महानगरपालिकेस पाठविण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कांदिवलीतील (मुंबई) पोयसर आणि गोरेगाव येथील शाळा, मैदान व रस्त्यासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाबाबत

**(४) ८०१ (०६-०४-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कांदिवलीतील पोयसर आणि गोरेगाव येथील शाळा, मैदान व रस्त्यासाठी आरक्षित असलेले ४३ हजार ३६० चौ.मी. चे सहा भूखंड ताब्यात घेण्यास महानगरपालिकेकडून विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड ताब्यात घेण्यासाठी दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास सुधार समितीत प्रस्ताव मांडण्यात आला असता सत्ताधारी पक्षाने सदर प्रस्ताव दप्तर दाखल करण्याची भूमिका घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घटनेनंतर पुन्हा पुन्हा सदरहू भूखंड ताब्यात घेण्यासाठी सातत्याने प्रस्ताव महानगरपालिका सभागृहासमोर मांडले असताना ते सातत्याने पुढील महिन्यांच्या कामाकाजासाठी पुढे ढकलले जात असल्याने बिल्डरांच्या फायद्यासाठीच भूखंड संपादन होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नगरविकास विभागाच्या नियमावलीनुसार ९० दिवसांत प्रस्ताव निकाली निघत नसेल तर सदर भुखंड तांत्रिकदृष्टया हे पालिकेने गमावल्याची शक्यता असून सुमारे ४० हजार चौ.मीटर क्षेत्रफळ असलेले हे भूखंड केवळ अतिक्रमणाचे कारण दाखवून मंजुरीविना प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदरील भूखंड ताब्यात घेण्यास विलंब करणा-या महानगरपालिका अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२०) :** (१) व (२) विकास आराखडा २०३४ नुसार मौजे पोईसर, कांदिवली (पूर्व) येथील न.भू.क्र. ८०९/अ/१/१९अ/१/१/१अ/३/अ/१/१/अ(भाग), ८५१/अ व ८४१ हे भूखंड प्राथमिक/माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा, क्रिडांगण, ३६.६० मी. रुंदी विकास नियोजित रस्ता व १३.४० मी. रुंदी विकास नियोजित रस्ता या सार्वजनिक उद्दिष्टांकरीता आरक्षित आहेत.

सदर भूखंडांच्या जमीन मालकाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक २०.०६.२०१८ रोजी बजावलेल्या पाच खरेदी सूचना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२७ मधील तरतुदीशी विसंगत असल्याने त्या महानगरपालिकेमार्फत अस्वीकृत करण्यात आल्या.

तथापि, अस्वीकृत करण्यात आलेल्या खरेदी सूचनांच्या अनुषंगाने न्यायालयीन प्रकरण उद्भवण्याची शक्यता विचारात घेता, स्वाधिकारे भूसंपादन करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेमार्फत सुधार समितीच्या मंजूरीकरीता सादर करण्यात आला आहे.

तसेच, विकास आराखडा १९९३ नुसार मौजे मालाड येथील न.भू.क्र. १२०८(भाग) हा भूखंड प्राथमिक शाळा, उद्यान व खेळाचे मैदान या सार्वजनिक उद्दिष्टांकरीता आरक्षित केला आहे.

सदर भूखंडाच्या जमीन मालकाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक २५.०४.२०१८ रोजी खरेदी सूचना बजाविली होती. त्यानुसार सदर भूखंड संपादन करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेमार्फत सुधार समितीच्या मंजूरीकरीता सादर करण्यात आला.

सदर ६ भूखंडांची सुधार समितीने दिनांक २९.१२.२०१८ रोजी पाहणी केली असता, मौजे पोईसर येथील ५ भूखंड पूर्णत: भारग्रस्त व मौजे मालाड येथील भूखंड अंशत: भारग्रस्त आढळला आहे.

त्यामुळे सुधार समितीने दिनांक ३१.१२.२०१८ रोजीच्या सभेमध्ये सदर ६ भूखंडांचे प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्याची शिफारस महानगरपालिका सभागृहाला केली आहे.

(३) मौजे पोयसर, कांदिवली ३६.६० मी. विकास नियोजित रस्ताच्या भूखंडाचा आगाऊ ताबा दिनांक २३.०१.२०२० रोजी “जसा आहे त्या स्थितीत” विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदीनुसार हस्तांतरणीय विकास हक्काच्या मोबदल्यात महानगरपालिकेमार्फत घेण्यात आला आहे.

मौजे पोयसर, कांदिवली येथील भूखंडाबाबत बजविण्यात आलेल्या खरेदी सूचना फेटाळून स्वाधिकारे भूसंपादन प्रस्ताविले असल्याने आरक्षण व्यपगत होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच, मौजे मालाड येथील भूखंड विकसित करण्यासाठी जमीन मालकाने समायोजन आरक्षणाखाली परवानगी मागितली असून, त्याबदल्यात जमीन मालकाने खरेदी सूचना मागे घेण्याची तयारी दर्शविली आहे. सदर प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) सदर दोन्ही भूखंडांच्या आरक्षणाबाबत दिनांक ३१ डिसेबर, २०१८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुधार समितीमध्ये दफ्तरी दाखल केलेले भूसंपादन प्रस्ताव महापालिका सभागृहाच्या जून, २०१९ च्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये समाविष्ट करण्यात आले होते व त्यानंतरच्या कार्यक्रम पत्रिकेपासून समाविष्ट आहेत.

तथापि, सदर प्रकरणी महापालिका सभागृहाने अद्यापि अंतिम निर्णय घेतलेला नसून, महापालिका सभागृहाच्या निर्णयानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण व अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यात मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकाम होत असल्याबाबत

**(५) १०३५ (०३-०४-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण व अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम होत असून या अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई करण्याकरीता संबंधित प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अंबरनाथ व कल्याण तालुक्यातील अनधिकृत बांधकामांवर तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

• महानगरपालिकेकडून अनधिकृत बांधकामावर विहित केलेल्या प्रक्रियेनुसार निरंतर कारवाई चालू आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे घोषित करुन त्याची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली.

• महानगरपालिका क्षेत्रातील बांधकामांच्या खरेदी-विक्री व्यवहाराची नोंद ही त्याच्या अधिकृततेसंबंधी नियोजन प्राधिकरणाकडून खात्री केल्यानंतरच करावी अशी विनंती सह दुय्यक निबंधक वर्ग-२ यांना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून करण्यात आली आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत महानगरपालिकेतर्फे मा.न्यायालयात २४७६ प्रकरणी कॅव्हेट तसेच संबंधित अनधिकृत बांधकाम धारकांविरुद्ध ३६९ गुन्हे दाखल केल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

• अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील अनधिकृत बांधकामांवर नगरपरिषदेमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येत आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतर्फे सर्व नागरिकांना खोट्या व फसव्या जाहिराती यांना बळी न पडता नियोजन प्राधिकरणाकडून खात्री करुनच बांधकाम खरेदी-विक्री करण्याचे जाहीर आवाहन केल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील मंत्रालय व परिसरातील शासकीय कार्यालयांमध्ये नुतनीकरण व दुरुस्ती करणाऱ्या कंत्राटदारांची बिले थकित असल्याबाबत**

**(६) १०६२ (१६-०३-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मंत्रालय व परिसरातील शासकीय कार्यालयांमध्ये नुतनीकरण व दुरुस्ती करणाऱ्या कंत्राटदाराची गत १० वर्षात सुमारे २०० कोटी रुपयांची बिले थकल्याने कामे करणाऱ्या कंत्राटदारांनी कामांकडे पाठ फिरवली असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील कंत्राटदारांची बिले अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

मंत्रालय व परिसरातील शासकीय कार्यालयांच्या देखभाल व दुरुस्तीचे काम इलाखा शहर (सा.बां.) विभागाकडे असून सदर विभागांतर्गत कामांचे रु.१२९.८४ कोटीचे देयके मार्च, २०१९ अखेर प्रलंबित होते. तथापि, निधीच्या उपलब्धतेनुसार थकित देयके वेळो-वेळी अदा करण्यात येत असल्यामुळे सद्य:स्थितीत या विभागातील कार्यारंभ आदेश दिलेली सर्व कामे प्रगतिपथावर आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मीरा-भाईंदर महानगरपालिकेने (जि.ठाणे) सुभाषचंद्र बोस मैदानावर क्रीडा संकुल उभारण्याबाबत केलेला आराखडा**

**(७) १२६२ (०३-०४-२०२०). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महानगरपालिकेने भाईंदर (पश्चिम) येथील ९ एकर जागेत असलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर क्रीडा संकुल विकसित करण्याचा आराखडा तयार केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भुखंडावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडीयम बनविण्याकरीता महानगरपालिकेला अंदाजे १५० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महानगरपालिकेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदरची जागा ही सॉल्ट विभागाची असल्याने या संदर्भात शासनामार्फत सॉल्ट विभागास प्रस्ताव पाठवून मान्यता प्राप्त झालेनंतरच सदर जागा विकसित करता येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मीरा-भाईंदर महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रात हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे तसेच स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे कला दालन बांधण्याबाबत**

**(८) १२७२ (०३-०४-२०२०). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र.१२२ या जागेत हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे दालन तसेच मीरा रोड (पूर्व) आरक्षण क्र.३०० या जागेत स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे कला दालन बांधण्याचे प्रस्तावित असून उक्त दोन्ही कला दालनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, नगरविकास यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त दोन्ही कला दालनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि. २१.०९.२०२० रोजी आ.क्र.१२२ येथे “हिंदु हृदयसम्राट शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे कला दालन” या कामाच्या एकूण रू.३८.०० कोटी इतक्या रक्कमेस शासन स्तरावरून तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मीरा-भाईंदर महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रातील होर्डींग्जच्या ठेक्याची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्याबाबत**

**(९) १२९३ (२१-०३-२०२०). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सन २०१४ पासून शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन जास्त आकाराच्या होर्डींग्ज अनधिकृत ठरवून त्यापाडून टाकणे तसेच महानगरपालिकेच्या मालकीची व खाजगी होर्डिंग्जचा ठेका रक्कम व जाहिरातीची रक्कम ठेकेदारांनी भरली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक जागी होर्डिंग आणि त्यावर जाहिराती करण्यासाठी आदित्य ॲडव्हर्टायझिंगला १२० होर्डिंग ठेक्याने दिले असता सदरहू ठेकेदाराने महानगरपालिकेचे एकूण २४ कोटी ४० लाख रुपये थकविल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०१४ पासून उक्त रक्कम प्रलंबित ठेवणा-या ठेकेदारांवर कारवाई करण्याबाबत तसेच ठेक्याची प्रलंबित रक्कम वसूल करुन सदर वसूलीकडे त्याकडे दुर्लक्ष करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-११-२०२०) :** (१) • मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जास्त आकारमानाच्या होर्डींग्जवर थकित जाहिरात कराचा भरणा न केल्यामुळे माहे २०१९ ते जानेवारी २०२० या काळात तोडक कारवाई करण्यात आली आहे.

• सन २०१९-२०२० या कालावधीत महानगरपालिकेच्या जागेवरील होर्डींग्जवरील एकूण मागणी रू.३,००,८५,७७४/- इतकी असून त्यापैकी रू.२,३७,२२,५४७/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

• खाजगी होर्डींग्जची थकबाकीसह मागणी रू.२४,७६,१३,०७७/- इतकी असून त्यापैकी रू.१,४४,५१,१३५/- इतकी रक्कम वसूल केलेली आहे.

(२) व (३) • मे.आदित्य ॲडव्हर्टायझिंग यांना मिरा-भाईंदर महानगरपालिकेने १३० होर्डींग्ज ठेक्याने दिलेले असून प्रत्यक्षात त्यांनी ९० होर्डींग्ज उभारले आहेत.

• मे.आदित्य ॲडव्हर्टायझिंग यांच्याकडे सन २०१९-२०२० पर्यंत रू.१,६२,००,९०१/- इतकी जाहिरात फी बाकी होती. त्यापैकी त्यांनी रू.१,३९,२०,४०१/- इतकी फी भरणा केली असून रू.२२,८०,५००/- इतकी थकबाकी आहे.

• मे.आदित्य ॲडव्हर्टायझिंग यांच्या ठेक्यातील जाहिरात फी थकबाकी वसुली करीता महानगरपालिकेकडून नोटीस बजावण्यात आली आहे. सदर नोटीशीस प्रतिसाद न दिल्याने त्यांच्या एकूण ८ होर्डीग्जवर तोडक कारवाई करण्यात आली असल्याचे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंत्रालय (मुंबई) येथील कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळण्याबाबत**

**(१०) १३७७ (१६-०३-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालय, मुंबई येथील कंत्राटी लिफ्टमन, हाऊसकिपींगचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना किमानवेतन मिळत नसल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदरहू कर्मचाऱ्यांना कंत्राटदार कंपन्यांकडून किमान वेतन व कामगार म्हणून आवश्यक ते लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१२-११-२०२०) :** (१) मंत्रालय व नवीन प्रशासन भवन हाऊस किपींगचे कामासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांनी ठेकेदार त्यांना दरमहा रु.८,३००/- इतके वेतन देण्यात येते. अशा आशयाचे निवेदन केले आहे. कंत्राटी लिफ्टमन यांच्याकडून निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) या संदर्भात हाऊस किपींगचे काम करणाऱ्या कंत्राटदारास निविदेतील शर्तीनुसार संबंधित कंत्राटदारास किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा करणे बंधनकारक आहे. त्यानुसार सदर प्रकरणी लेखा परीक्षण करुन निविदानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

मंत्रालयातील उद्वाहन चालकांना प्रतिमाह किमान वेतन कायद्यानुसार वेतन देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव ते नशिराबाद चौपदरीकरणाच्या रखडलेल्या कामाबाबत**

**(११) १८५२ (२१-०३-२०२०). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) जळगाव ते नशिराबाद चौपदरीकरणाचे काम रखडलेले आहे, जळगाव शहरातून गेलेल्या सदर १० किलोमीटर महामार्गास समांतर रस्ते नसल्याने गत दोन महिन्यात अनेक अपघात झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौपदरीकरणाचे काम अतिशय संथगतीने होत असून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी नागरिकांच्या वतीने जळगाव विभागात आयोजित केलेल्या सर्वपक्षीय बैठकीनंतर स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महामार्गावरुन दररोज प्रवास करणा-या शेकडो वाहनचालक व प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून अपघात होणे हे नित्याचे झालेले आहे, तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, स्थानिक आयुक्त, महापौर हे आपआपल्या जबाबदा-यांकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने जळगाव ते नशिराबाद चौपदरीकरणाच्या रखडलेल्या कामाबाबत व त्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२४-११-२०२०) :** (१) जळगाव ते नशिराबाद चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

सदर चौपदरीकरणांतर्गत जळगांव शहरामध्ये कालिकामाता मंदीर ते खोटेनगर या ७.७५३ किमी चौपदरीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून सद्य:स्थितीत ३९.६४ टक्के काम पूर्ण झाले आहे. याव्यतिरिक्त खोटेनगर ते पाळधी बायपास मधील जळगांव शहरातील नुतनीकरणाकरिता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत राज्य शासनास ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तसेच जळगाव ते नशिराबाद चौपदरीकरणाचे काम सद्य:स्थितीत जलद गतीने सुरु असुन विहित मुदतीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, जळगांव यांनी कळविले आहे.

जळगाव शहरातील १० कि.मी. पैकी उर्वरित लांबी करिता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या लांबीतील चौपदरीकरणाकरिता राज्य शासनामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

पोलिस विभागाकडील प्राप्त अहवालानुसार रस्त्यावर झालेले बहुतांशी अपघात हे अती वेगाने वाहने चालविल्याने झाल्याचे दिसून येते, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, जळगांव यांनी कळविले आहे.

(२) सदर चौपदरीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी नागरीकांच्या बैठकीनंतर स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री यांचेकडे केली होती व सद्य:स्थितीत विषयांकित काम जलद गतीने सुरु आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, जळगांव यांनी कळविले आहे.

(३) सदरील प्रकल्पाचे काम करत असतांना वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टिने आवश्यक उपाय योजना करण्यात आल्या आहेत. तसेच पोलिस विभागाकडील प्राप्त अहवालानुसार रस्त्यावर झालेले बहुतांशी अपघात हे अती वेगाने वाहने चालविल्याने झाल्याचे दिसून येते, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, जळगांव यांनी कळविले आहे.

(४) व (५) जळगाव ते नशिराबाद चौपदरीकरणाचे काम दोन भागांमध्ये करण्यात येत असून चिखली ते तरसोड (कि.मी.३६०.०० ते कि.मी.४२२.७००) व तरसोड ते फागणे (कि.मी.४२२/७० ते कि.मी. ५१०/००) ह्या दोन प्रकल्पांतर्गत समाविष्ट आहे.

सद्य:स्थितीत त्यापैकी चिखली ते तरसोड प्रकल्पाचे काम ६६.३४ टक्के काम पूर्ण झाले आहे व तरसोड ते फागणे प्रकल्पाचे काम १६.८५ टक्के पूर्ण झाले आहे. उर्वरीत काम जलद गतीने प्रगतीपथावर असून जुलै २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच सदर चौपदरीकरणांतर्गत जळगांव शहरातील कालिकामाता मंदीर ते खोटेनगर या ७.७५३ किमी चौपदरीकरणाचे हाती घेतलेले काम सद्य:स्थितीत ३९.६४ टक्के पूर्ण झाले असून उर्वरीत काम मार्च २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, जळगांव यांनी कळविले आहे.

जळगाव शहरातील १० कि.मी. पैकी उर्वरित लांबी करिता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले असून सदर लांबीतील चौपदरीकरणाकरिता राज्य शासनामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**अकोला (जि.अकोला) महानगरपालिकेमध्ये केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत योजनेंतर्गत शौचालय बांधकामात झालेला गैरव्यवहार**

**(१२) २०९८ (०३-०४-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) महानगरपालिकेमध्ये केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालय बांधकामात गैरव्यवहार झाला असल्याची बाब दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास अकोला महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर व्यक्तिगत शौचालय बांधत असताना जिओ टॅगिंग करण्यात आले नसल्याचा आरोप नगरसेवकांनी सर्वसाधारण सभेमध्ये केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अहवाल तयार करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालामध्ये कोणकोण दोषी आढळले व त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली तसेच सदर अहवालावर शहर अभियंता यांची स्वाक्षरी नसल्याचाही आरोप नगरसेवकांनी केला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर अहवालानुसार व नगरसेवकांनी दिलेल्या तक्रारीनुसार अकोला महानगरपालिकामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२०) :** (१) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची अंमलबजावणी दिनांक १५ मे २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरू आहे. सदर शासन निर्णयातील नमूद बाबींनुसार अंमलबजावणी झाली नसल्याने महासभेने दि. ५/११/२०१८ रोजी ठराव क्र. ४ नुसार याबाबत सोशल ऑडिट करून त्याबाबतचा अहवाल १५ दिवसात सादर करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार, चौकशी पूर्ण करण्यात आली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सदर अहवालात "संबधित विभागाने अनुभवी अभियंत्यांकडून वैयक्तीक व सामुदायिक शौचालयांची तात्काळ तपासणी करून संबंधित दोषी असलेल्या कंत्राटदार व महिला बचत गट यांच्या कडून सदर निकृष्ट व दर्जाहीन कामे सुस्थितीत दुरूस्त करून घ्यावयाची व आवश्यकता भासल्यास जे कंत्राटदार व महिला बचत गट हे दुरूस्तीत महानगरपालिकेला सहकार्य करणार नाहीत त्यांचेवर काळ्यायादीत टाकण्याची कार्यवाही तसेच आर्थिक दंडाची कार्यवाही प्रशासनाने करावी असे नमूद आहे. तसेच ज्या शौचालयांचे जिओ टॅगिंग करण्यात आलेले नाही ते तातडीने करण्यात यावे" असे नमूद करण्यात आले आहे.

या अहवालावर शहर अभियंता यांची स्वाक्षरी नसल्याचा आरोप नगरसेवकांनी केला आहे, ही बाब खरी असल्याचे अकोला महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(५) ज्या शौचालयांची जिओ टॅगिंग करण्यात आलेली नाही ते तातडीने करण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात आल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खामगांव (जि.बुलढाणा) मतदार संघात सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे संथगतीने सुरु असल्याबाबत

**(१३) २५७२ (२१-०३-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) मतदार संघात सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे ५०५४ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग शिर्षकातंर्गत मोठ्या प्रमाणात कामे सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, खामगांव मतदार संघात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ५०५४ मार्ग व पुल ०३ राज्यमार्ग (हायब्रीड अन्युईटी HAM) या शिर्षकांतर्गत दोन कामे सुरु आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरची कामे अपु-या निधीमुळे संथगतीने सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामांना निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग खामगांव यांनी शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीनुसार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-११-२०२०) :** (१) व (२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

खामगांव मतदार संघातील एकूण ४१ कामांपैकी २४ कामे पूर्ण व ५ कामे प्रगतीत आहेत. तर ११ कामे कार्यारंभ आदेश स्तरावर व १ कामे मार्च, २०२० मध्ये मंजूर असून, अंदाजपत्रक स्तरावर आहे. असे एकूण ४१ कामासाठी सन २०२०-२१ करीता रुपये २७२११.५३ लक्ष मागणी केलेली आहे. या सर्व कामांवर सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात छापील तरतूद रुपये ३२२१.४६ लक्ष असून वितरीत निधी रुपये ०.०० लक्ष एवढा आहे.

हायब्रीड ॲन्युईटीच्या २ कामांसह अर्थसकंल्पातील कामांची प्रलंबित देयकाची रक्कम रुपये ३८३४.४५ लक्ष आहे. तसेच अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार कामे प्रगतीपथवर आहेत.

(४) व (५) सदर कामाबाबत क्षेत्रिय स्तरावरुन केलेल्या निधीच्या मागणीच्या अनुषंगाने उपलब्ध निधीतून प्राधान्याने सदर कामास निधी वितरीत करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील राजूर घाटामध्ये एकेरी वाहतूक करणेबाबत

**(१४) २९३६ (२१-०३-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील राजूर घाटामध्ये एकेरी वाहतूक करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लेखी निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२५-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरची लांबी मलकापूर बुलडाणा चिखली राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ अ चा भाग असून सद्यस्थितीमध्ये हा रस्ता खाजगीकरणाच्या कार्यान्वयन कालावधीमध्ये आहे. या प्रकल्पाच्या वावामध्ये हे काम समाविष्ट नव्हते. त्यामुळे राजूर घाटामध्ये नवीन पर्यायी रस्ता बांधण्यासाठी राखीव वनजमिनीसह खाजगी मालकीची जमीन संपादित करणे, नवीन रस्ता आवश्यक पुलांसह बांधकाम करण्यासाठी अंदाजे रू.४८.१७ कोटी खर्च अपेक्षित आहे. निधी व निकषानुसार प्राधान्याने सदर काम हाती घेतले जाईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांकरीता आलेली पुस्तके शहर साधन केंद्रामध्ये पडून असल्याबाबत**

**(१५) ३०३० (०५-०४-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतील अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष संपले तरी अद्याप पुस्तके मिळाली नसल्याची माहिती माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समग्र शिक्षा मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत आलेली पुस्तके पालिकेच्या भांडुप येथील शहर साधन केंद्रामध्ये पडून आहेत, त्यामुळे शासनाचे लाखो रुपये वाया गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शिक्षणाकरिता सुमारे ३००० कोटी रुपयांची तरतूद असतांना मुंबईतील महानगरपालिकेच्या शाळांची दुरवस्था होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरील तरतूदीचा विनियोग कशा प्रकारे करण्यात येत आहे,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबधित दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२०) :** (१) शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये कोणताही विद्यार्थी सदर सुविधेपासून वंचित राहिला नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) प्रत्येक शहर साधन केंद्राकडे मागील वर्षाची शिल्लक पुस्तके व स्वाध्यायांचे समायोजन करुन पुढील वर्षाच्या निव्वळ मागणीबाबत नियोजन करणे अपेक्षित होते.

तथापि भांडुप येथील शहर साधन केंद्राने स्थलांतरीत किंवा गैरहजर मुलांची शिल्लके पाठ्यपुस्तके व स्वाध्याय यांचे प्रत्येक वर्षी समायोजन न केल्यामुळे ११,४२६ पाठ्यपुस्तके व ११,४७३ स्वाध्याय पुस्तिका शिल्लक राहिल्या ही वस्तुस्थिती आहे.

सदर बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये लक्षात आल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये समायोजन करुन शिल्लक पुस्तके विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आली असल्यामुळे आर्थिक नुकसान झालेले नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या महसुली खर्चाकरिता तरतूद करण्यात आलेल्या रु.१७१४.८९ कोटी इतक्या रकमेपैकी शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या आस्थापनाकरिता रु.९९४.१८ कोटी आणि मनपा शालेय इमारतींबाबतचे विविध कर, विविध सुविधा तसेच हाऊसकिपींग, शालेय विद्यार्थी इ. करिता रु.७२०.७० कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

भांडवली खर्चांतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांकरिता रु.२२५.३९ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली असून, त्यापैकी टॅब, व्हीटीसी लॅब, डिजीटल क्लासरुम, साऊंड

सिस्टीम, संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा, भाषा विकास प्रयोगशाळा, शालेय स्तरावरील आवश्यक उपस्कर (डेस्क आणि बेंचेस) इत्यादीकरिता रु.२३.६६ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

तसेच, ४६७ शालेय इमारतींची देखभाल दुरुस्ती, इमारत जमीनदोस्त करुन पुनर्बांधणी करणे, नवीन शालेय इमारतींची बांधणी इ. करिता रु.२०१.७२ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्थापन करण्यात आलेल्या “शाळा पायाभूत सुविधा कक्ष” स्थापन करण्यात आला असून, या विभागामार्फत प्रत्येक शालेय इमारतीचे संरचनात्मक परिक्षण करुन गरजेनुसार देखभाल दुरुस्ती करण्यात येते.

(४) मंजूर झालेल्या विविध प्रकल्प व उपक्रमांची अंमलबजावणी यशस्वीरित्या झाल्यानंतर उपलब्ध निधीचा विनियोग सॅप प्रणालीद्वारे केला जातो असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) व (६) भांडुप येथील शहर साधन केंद्रातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी प्रत्येक वर्षी शिल्लक पाठ्यपुस्तक व स्वाध्याय पुस्तिकांचे समायोजन न केल्यामुळे त्यांची संक्षिप्त चौकशी सुरु असून, प्राप्त होणाऱ्या निवेदनांच्या आधारे दोषी ठरणाऱ्या अधिकारी/कर्मच्याऱ्यांवर मनपा सेवानियमावलीनुसार उचित कारवाई करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## पुणे शहरातील नालेसफाई व रस्ते कचरा वाहतुकीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) ३२१५ (१६-०३-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील नालेसफाई व रस्ते कचरा वाहतुकीच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी शहरातील नालेसफाई व रस्ते कचरा वाहतुकीच्या कामांचे स्वरूप व तपशिल, अवलंबिलेली कार्यपध्दती, देयक अदायगीची पध्दत, नोंदी याचा स्वंयस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबतचा आदेश महानगरपालिका प्रशासनास दिला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशाची अंमलबजावणीच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेकडून अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२०) :** (१) पुणे शहरातील नालेसफाई व कचरा वाहतुकीच्या अनुषंगाने वेळोवेळी स्थानिक वृत्त पत्रामध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) • दिनांक ०६.०७.२०१८ च्या शासन पत्रान्वये पुणे महानगरपलिकेच्या हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन विषयक कामांचे स्वरुप व तपशिल, अवलंबलेली कार्यपद्धती, देयक अदायगी पद्धत, नोंदी याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल मागविण्यात आला होता.

• सदर अहवाल दिनांक २१.१०.२०२० च्या पत्रान्वये पुणे महानगरपालिकेकडून शासनास प्राप्त झाला होता.

• तथापि, सदर अहवालाची तपासणी केल्यानंतर काही मुद्यांच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेकडून फेर अहवाल मागविण्यात आलेला आहे.

• सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे प्रायोजन आहे.

---

**पुणे शहरातील मुळा-मुठा नदीच्या पुनरूज्जीवन प्रकल्पाबाबत**

**(१७) ३४७३ (०५-०४-२०२०). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातून वाहणाऱ्या मुळा व मुठा या नद्या व मुळा-मुठा नदी पुनुरूज्जीवन प्रकल्प राबविणेसाठी स्पेशल पर्पज व्हेईकल (एसपीव्ही) स्थापन करणेस व नदीची जागा एसपीव्ही ला हस्तांतरित करणेस, जलसंपदा विभागाची मान्यता मिळणेबाबत चा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई व दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे पाठविला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नसून प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(३) असल्यास, मुळा-मुठा नदी पुनुरूज्जीवन प्रकल्प राबविणेसाठी स्पेशल पर्पज व्हेईकल (एसपीव्ही) स्थापन करणेस व नदीची जागा एसपीव्ही ला हस्तांतरित करणेस नगरविकास / जलसंपदा विभागाची मान्यता मिळणेबाबत शासनाने कोणत्या स्वरुपाची उपाययोजना/कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२०) :** (१) या प्रकरणी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रस्तावाची शासन स्तरावर तपासणी करण्यात येत आहे.

---

## मुंबई मधील एम-पूर्व विभागात असणाऱ्या मानखुर्द शिवाजीनगर भागात घाणीचे साम्राज्य पसरलेले असल्याबाबत

**(१८) ४१२३ (०५-०४-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील एम-पूर्व विभागात असणाऱ्या मानखुर्द शिवाजीनगर भागात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरलेले असून सदर कचऱ्यामुळे नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत असल्याची बाब दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभाग व प्रशासनाकडे कचऱ्याची समस्या सोडविण्यात यावी यासाठी वारंवार मागणी करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२०) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागातील मानखुर्द शिवाजीनगर भागामध्ये दिनांक ०४.०१.२०२० च्या सुमारास घाणीचे साम्राज्य पसरले असल्याची कोणतीही तक्रार वृत्तपत्राद्वारे तसेच इतर कोणत्याही माध्यमातून प्राप्त झाली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागातील मानखुर्द शिवाजीनगर हा परिसर पूर्णपणे झोपडपट्टीमय भाग आहे.

सदर भागातील साफसफाईच्या कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कामगार नियुक्त करण्यात आले आहेत.

तसेच, ज्या वस्त्यांमध्ये महानगरपालिका कामगारांमार्फत सुविधा पुरविली जात नाही तेथे स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान अंतर्गत तसेच रस्ते स्वच्छता योजनेंतर्गत साफसफाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या अनेक योजना प्रलंबित असल्याबाबत

**(१९) ४४५६ (२०-०३-२०२०). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या अनेक योजना प्रलंबित असून काही प्रकल्पांचे बांधकाम बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पातील रहिवाशांना वेळेवर भाडे मिळत नसून संक्रमण शिबिरे व्यवस्थित नसल्याने नागरिकांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्पांना गती देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड (१९-११-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे एकूण २६३ योजनेच्या वेगवगळया टप्प्यावर काम सुरू आहेत. २६३ योजनेपैकी ६६ योजनेचे बांधकाम सुरु असून, ६७ योजनांना अंतिम/ अशंत: पुर्ण भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सद्य:स्थितीमध्ये बंद असलेले काही योजनांचे काम वेळेत पुर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

(२) होय, अंशत: खरे आहे.

कोरोना रोगराईच्या पार्श्वभुमीवर विकासकामार्फत राबविण्यात येणारे काही प्रकल्प ठप्प असल्याने काही झोपडीधारकांचे प्रकल्प प्रलंबित असल्याचे दिसून येते. सदर झोपडीधारकांना भाड्याची रक्कम मिळविण्याकरीता प्रधिकरणामार्फत सतत पाठपुरावा करण्यात येत आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत संक्रमण शिबिरामध्ये तात्पुरत्या स्वरूपात निवास करत असणाऱ्या झोपडीधारकांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. संक्रमण शिबिरामध्ये स्वच्छता राखण्यासाठी दैनंदिन कचरा घेऊन त्याची विल्हेवाट लावण्याचे काम स्वच्छ पुणे या संस्थेस देण्यात आले आहे.

(३) व (४) नाही, तथापी, झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना गती देण्यासाठी सन २०१४ च्या विकास नियंत्रण नियमावली मध्ये काही प्रमाणात फेर बदल करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मध्ये करण्यात आलेली सुधारणेस अनुसरून ३ (ब) खालील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र पुणे साठीचे सर्व साधारण झोपडपट्टी योजना सुधारणेचे प्रारूप शासन स्तरावर विचाराधीन असुन त्यास शासनाचा निर्णय झाल्यानंतर प्राधिकरणामार्फत जनतेच्या हरकती व सुचना मागविण्याकरीता प्रसिध्द केली जाईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबरनाथ शहरात (जि.ठाणे) कचरा ट्रॉली विनावापर पडून असल्याबाबत**

**(२०) ५०७३ (०५-०४-२०२०). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ शहरात (जि.ठाणे) स्वच्छता मोहीम आणि ओला, सुका कच-याच्या संकलनासाठी दोन कप्प्याच्या २० कचरा ट्रॉली निविदा प्रक्रियेतून अहमदनगर जिल्ह्यातील महाविर ट्रेडर्स या कंपनीकडून अंबरनाथ नगरपरिषदेला १२ वर्षापूर्वी पाठविण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कचरा ट्रॉली या जादा किंमतीत मागविण्यात आल्याबाबात नगरपरिषद सभागृहात चर्चा झाल्यानंतर सदर ट्रॉली न वापरण्याच्या सूचना संबंधित विभागाला तत्कालीन मुख्याधिकारी यांनी दिल्यामुळे सदर कचरा ट्रॉली मागील १२ वर्षापासून वापराविना अंबरनाथ नगरपरिषदेच्या मागील मैदानात पडून आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शहरातील ओला व सुका कचऱ्याचे संकलन करण्यासाठी तसेच स्वच्छता मोहीम राबविण्यासाठी सदर कचरा ट्रॉली वापरात याव्यात यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे तसेच कचरा ट्रॉलीच्या दराबाबतही चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) अशा आशयाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर यासंदर्भात नगरपरिषद सभागृहात चर्चा झाली. तथापि, सदर कचरा ट्रॉली वापरात न आणण्याच्या सूचना मुख्याधिकारी यांनी दिलेल्या नाहीत. तसेच, सदरहू ट्रॉली विना वापर पडून असल्याची वस्तुस्थिती अंबरनाथ नगरपरिषदेने कळविली आहे.
(३) अंबरनाथ नगरपरिषदेच्या प्राप्त अहवालावरुन निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, ठाणे यांना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) नगररचना विभागातील जल अभियंता यांची विभागीय चौकशी करण्याबाबत

**(२१) ५४६४ (०६-०४-२०२०). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) नगररचना विभागातील एका सुनावणीला विकासक श्री.गिरीधर कोलते यांच्याऐवजी महानगरपालिका सेवेत जल अभियंता म्हणून कार्यरत असलेले त्यांचे चिरंजीव श्री.चंद्रकांत कोलते हे विकासकाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा वर्तवणूक शिस्त नियमांचा भंग केल्याचा ठपका ठेवत विभागीय चौकशीचा प्रस्ताव माहे नाव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) •श्री.चंद्रकांत कोलते, प्रभारी जल अभियंता यांनी केलेल्या अनियमिततेबाबतची चौकशी करणेकरीता सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकरीता प्रस्ताव सादर केले असता, सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ६१, दि. २०.१२.२०१९ अन्वये सदर प्रस्ताव फेटाळलेला आहे.

• सदर प्रकरणाची विभागीय चौकशी करण्याची फेटाळलेली मागणी तसेच तक्रारदार यांनी दि.१४.०१.२०२० रोजीच्या तक्रार अर्जान्वये केलेली मागणी याबाबत महापालिका स्तरावर पुढील कार्यवाही प्रस्तावित असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये बांधण्यात आलेल्या स्कायवॉकची झालेली दुरवस्था

**(२२) ६२२१ (०६-०४-२०२०). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये बांधण्यात आलेल्या स्कायवॉकची दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, अनेक स्कायवॉक मोडकळीस आलेले असून भिकारी व गर्दुल्ले यांचे या स्कायवॉकवर मोठ्या प्रमाणावर वास्तव्य वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने स्कायवॉकची देखभाल व दुरुस्तीसाठी शासन कोणती कार्यवाही/ उपाययोजना केली वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई शहर व उपनगरातील स्कायवॉकवर मोठ्या प्रमाणावर दुरुस्तीची आवश्यकता असून काही स्कायवॉक पादचाऱ्यांसाठी बंद करण्यात आले आहेत.

तसेच, स्कायवॉकवरील भिकारी आणि गर्दुल्ले यांच्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्थानिक पोलीसांच्या मदतीने नियमितपणे कारवाई करण्यात येते.

(३) मुंबई शहर व उपनगरातील स्कायवॉकच्या दुरुस्ती करण्याबाबत व्ही.जे.टी.आय. (VJTI) या शैक्षणिक संस्थेची नेमणूक करण्यात आली होती. सद्य:स्थितीत संरचनात्मक तपासणीचे काम पूर्ण करुन अहवाल प्राप्त झाले असून दुरुस्तीचे काम अहवालातील निष्कर्षानुसार प्राधान्याने हाती घेण्यात येत आहे.

(४) लागू नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेमधील २७ गावांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याच्या मागणीबाबत

**(२३) ८८७० (२८-०५-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवलीतील (जि.ठाणे) २७ गावांपैकी १८ गावे वगळून त्यांची नगर परिषद करण्याचा व ९ गावे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्येच ठेवण्याच्या मा.मुख्यमंत्र्यांनी मागील अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी जाहीर केलेल्या निर्णयाला विरोध दर्शवणारी निवेदने स्थानिक लोकप्रतिनिधी व सर्वपक्षीय हक्क संरक्षण समितीने माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे सादर केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नऊ गावे जी महानगरपालिकेत ठेवण्यात आली आहेत त्या गावांचा विकास झालेला नसून महानगरपालिकेत ठेवण्याची या गावांचीही कधीही मागणी नव्हती त्यामुळे २७ गावांची नगरपरिषद स्थापन करावी अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिकांची सदर मागणी विचारात घेता शासन आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करणार आहे काय,

(४) असल्यास, त्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमधील २७ गावांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याबाबत सर्वपक्षीय हक्क संघर्ष समिती, सर्वपक्षीय युवा मोर्चा तसेच सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वेळोवळी मागणी केली होती.

• याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या दि.१३.०३.२०२० च्या अहवालातील शिफारस विचारात घेऊन उपरोक्त नमूद २७ गावांपैकी ९ गावे महानगरपालिकेत ठेऊन उर्वरित १८ गावे महानगरपालिकेमधून वगळुन त्यांची नगरपरिषद स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

• त्यास अनुसरून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून १८ गावे वगळून या गावांची नगरपरिषद घटीत करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने दि.२४.०६.२०२० रोजी प्राथमिक उद्‌घोषणा प्रसिध्द केली आहे.

• त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे ३० दिवसाच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या सूचना व हरकतींचे अनुषंगाने अहवाल शासनास सादर करण्याबाबत त्यांना कळविण्यात आले आहे.

• उर्वरित ९ गावांचे झालेले शहरीकरण, एमआयडीसी क्षेत्र, टाऊनशीप, स्मार्टसिटी अंतर्गत क्षेत्र व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची भौगोलिक सलगता विचारात घेता ही गावे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतच ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

---

## मुंबईतील सायन रुग्णालयात मृतदेह वॉर्डमध्येच प्लास्टिकच्या आवरणात ठेवण्यात आल्याबाबत

**(२४) ८८७३ (२८-०५-२०२०). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सायन, कुपर, के ई एम, राजावाडी या रुग्णालयात रुग्णांच्या खाटांवरच प्लास्टिक आवरणामध्ये मृतदेह गुंडाळून ठेवण्यात येऊन या खाटांच्या बाजूलाच असणाऱ्या खाटांवर करोनाचे रुग्ण उपचार घेत असल्याचा व्हिडिओ दिनांक ८ मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान सर्वत्र प्रसारमध्यमांमध्ये प्रसारित झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लास्टिकच्या आवरणात गुंडाळून ठेवलेल्या मृतदेहांजवळच कोरोना रुग्ण, नातेवाईक, डॉक्टर, नर्स फिरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना रुग्णांचे नातेवाईक मृतदेह ताब्यात घेण्यास टाळाटाळ करीत असल्याने तसेच शवागारांची असलेली कमतरता यामुळेच हे घडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात येऊन शवागारांची संख्या वाढविण्याबाबत तसेच मृतदेहांची हेळसांड थांबवून त्यांचे पुढील योग्य ते अंतिम संस्कार कोरोनाचा प्रादुर्भाव होऊ न देता पार पाडण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२०) :** (१), (२) व (३) सायन रुग्णालयात कोविड-१९ च्या उपचारादरम्यान मृत्यू होणाऱ्या कोविड बाधीत रुग्णांचे मृतदेह संसर्ग टाळण्यासाठी लिकप्रुफ प्लास्टिक बॅगमध्ये निर्जंतुकीकरण करुन ठेवण्यात येतात.

मात्र मृताचे नातेवाईकांचे आगमन, पोलीस विभागाकडील ना-हरकत प्रमाणपत्र इत्यादी प्रशासकीय बाबी पूर्ण होण्यास विलंब लागला. त्यामुळे सदर मृतदेह रुग्ण कक्षामध्ये काही काळ ठेवावा लागला याची चित्रफित दिनांक ६ मे, २०२० रोजी समाजमाध्यमांवर प्रसारित झाली

(४) सदर चित्रफितीची सत्यता आणि वास्तविकता पडताळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीस सदर चित्रफित दिनांक १८ एप्रिल, २०२० पूर्वीची असल्याचे आढळून आले.

कोविड रुग्णांच्या मृतदेहांच्या बाबतीत निश्चित करण्यात आलेल्या मानक कार्यपध्दतीनुसारच कार्यवाही केली जात असल्याचे आढळून आल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच, सदर समितीच्या शिफारशीनुसार कोविड रुग्णांचे मृतदेह हाताळण्यासाठी सविस्तर मानक कार्यपध्दती निर्गमित करण्यात आली असून, त्यानुसार कार्यवाही केली जात असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेने खरेदी केलेल्या वैद्यकीय वस्तू तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठीच्या साहित्य खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२५) ११३१९ (१०-०७-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई महानगरपालिकेने खरेदी केलेल्या वैद्यकीय वस्तू तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठीच्या साहित्य खरेदी व्यवहारामध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना रुग्णांचे मृतदेह ठेवण्यासाठी लागणाऱ्या प्लास्टिकच्या शव पिशव्यांसाठी मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयाने प्रति पिशवी अवघे १३५० रुपये खर्च केले असताना, मुंबई महानगरपालिकेने मात्र प्रति पिशवी ६७१० रुपये खर्च केले असल्याचे दिनांक १७ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोनाग्रस्त रुग्णांचा मृत्यू झाल्यानंतर मृतदेह गुंडाळण्यासाठीद येणारी पिशवी किरकोळ बाजारात ५०० ते १४०० रुपयांना मिळत असतानाही सदर पिशवी ६७०० रुपये म्हणजे बाजारभावापेक्षा पाच पट जास्त दराने खरेदी केल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याचप्रमाणे कोरोना काळात प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून खरेदी करण्यात आलेले मास्क, सॅनिटायझर, निर्जंतुकीकरण यंत्र, खाटा, विलगीकरण केंद्रांची बांधणी, थर्मामीटर पल्स- ऑक्सीमिटर, जेवण, धान्य वाटप या सर्वच बाबी
चढ्या दराने खरेदी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदरहू गैरव्यवहार प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विभागांमध्ये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर खरेदी केलेल्या वैद्यकीय वस्तू तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठीचे साहित्य महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्याच्या निर्गमित दर परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आलेल्या दरानुसार करण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) के.ई.एम. रुग्णालयाने कोरोना रुग्णांचे मृतदेह ठेवण्यासाठी लागणाऱ्या प्लास्टिकच्या शव पिशव्या रु. १३५०/- प्रति पिशवी इतक्या दराने खरेदी केलेल्या नाहीत.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रति पिशवी रु.६७१९/- खर्च केले ही बाब खरी आहे.

(३) कोरोनाग्रस्त रुग्णांचे शव गुंडाळण्यासाठी पिशव्या खरेदी करण्याबाबचे परिपत्रक महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत जारी करण्यात करण्यात आले आहेत.

सदर पिशव्या रु.६७१९/- प्रति पिशवी इतक्या दराने खरेदी करण्यात आल्या असून, सदर पिशव्यांचा जीईएम (GEM) पोर्टलवरील दर महानगरपालिकेच्या खरेदी दरापेक्षा रुपये एक ते दीड हजारांनी जास्त असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर वस्तू चढ्या दराने खरेदी करण्यात आल्या नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निफाड (जि.नाशिक) या ग्रामपंचायती कर्मचाऱ्यांना नगरपंचायतीमध्ये सेवेत सामावुन घेणेबाबत**

**(२६) ११४२८ (१७-०९-२०२०). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) या ग्रामपंचायतीचे शासनाच्या धोरणाप्रमाणे नगर पंचायतीमध्ये रूपांतर झाले असून नगरपंचायतमध्ये रूपांतरित होण्यापूर्वी या ग्रामपंचायतीमध्ये एकुण ७४ कर्मचारी सेवा करीत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ७४ कर्मचारी यांचे पैकी केवळ १४ कर्मचाऱ्यांना नगरपंचायतीमध्ये सेवेत सामावून घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित ६० कर्मचाऱ्यांना नगरपंचायतीने सेवेत सामावून घ्यावे अशा प्रकारची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उर्वरित ६० कर्मचाऱ्यांना नगरपंचायतीमध्ये सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२०) :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.

• निफाड नगरपंचायतीची लोकसंख्या व आवश्यकता याप्रमाणे शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधापैकी पदावर विभाग व जिल्हा स्तरावर एकूण ७७ पदांपैकी १५ कर्मचाऱ्यांचे यापूर्वीच समावेशन झाले असून, त्यापैकी १ कर्मचारी सेवानिवृत्त झाला आहे.

• तसेच उर्वरित ६२ कर्मचाऱ्यांपैकी ४ कर्मचारी सेवानिवृत्त व १ कर्मचारी मयत झाले आहेत.

• ५७ कर्मचाऱ्यांपैकी १८ कर्मचाऱ्यांच्या समावेशनाची बाब नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या स्तरावर तपासण्यात येत आहे.

• उर्वरित ३९ कर्मचारी सफाई कामगार पदावर कार्यरत आहेत. नवनिर्मित नगरपंचायतींमध्ये ग्रामपंचायत कालिन सफाई कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्याबाबतची बाब शासन स्तरावर तपासण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हायब्रिड ॲन्यूईटी तत्वावर करण्यात येत असलेल्या पिंपळगांव बसवंत-निफाड-सिन्नर रस्त्याच्या कामाबाबत

**(२७) ११४८३ (१७-०९-२०२०). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हायब्रिड ॲन्यूईटी तत्वावर रस्त्याचा डीपीआर तयार करून अनेक कामे करण्यात येत असून डीपीआर तयार करताना त्यामध्ये रस्त्याचे विस्तारीकरण करणे, नागमोडी वळणे सरळ करणे, पुल व मोऱ्याचे रुंदीकरणासह बांधकामे करणे आदि बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपळगांव बसवंत-निफाड-सिन्नर या रस्त्याचे काम हायब्रिड ॲन्यूईटी याच तत्वावर करण्यात येत असताना मात्र या रस्त्यावरील रौळस, लोणवाडी येथील नागमोडी वळणे सरळ न करणे, पिंपळगाव बसवंत येथील पाराशरी नदीवरील पूल, लोणवाडी येथील काजळी नदीवरील पूल, दावचवाडी येथील मनकर्णिका नदीवरील पुल, कुंदेवाडी येथील बागमार इस्टेट जवळील पूल व निफाड येथील विनता नदीवरील पूल या पुलांच्या बांधकामासह निफाड व रौळस या गावातून जाणाऱ्या रस्त्यांचे काँक्रिटीकरण न करता कामे केली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपळगांव बसवंत-निफाड-सिन्नर या रस्त्याचे काम हायब्रिड ॲन्यूईटी तत्वावर करण्यात येत असतांना रस्त्याचा डीपीआर मधे उक्त कामांचा समावेश करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार पिंपळगांव बसवंत-निफाड-सिन्नर या रस्त्याच्या डीपीआर मध्ये सदरहु कामांचा समावेश करणे आवश्यक असताना देखील यामध्ये हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-११-२०२०) :** (१), (२) व (३) होय.

शासनाच्या हायब्रीड ॲन्युईटी योजने अंतर्गत पॅकेज क्र.NSK-५५A मध्ये "नामपूर सटाणा कळवण-वणी-पिंपळगांव-निफाड-सिन्नर रस्ता रामा २७ कि.मी. ९८/३०० ते १५४/०० (प्रत्यक्ष कि.मी. ९५/ ५०० ते १५१/१८४) ची सुधारणा करणे ता.निफाड आणि सिन्नर (पिंपळगांव ता.सिन्नर)" या नाशिक जिल्हयातील रस्त्याचे काम मंजूर असून, सदर काम सद्यस्थितीत प्रगतीत आहे.

प्रश्नामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे पिंपळगांव -निफाड-सिन्नर या लांबीमध्ये हायब्रीड ॲन्यूईटी तत्वावर रस्त्याचा डीपीआर तयार करतांना त्यामध्ये रस्त्याचे विस्तारीकरण करणे, काही पुल मोऱ्याचे रुंदीकरणासह बांधकाम करणे आदि बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. परंतु हायब्रीड ॲन्युईटी योजनेतील कामांचे डीपीआर तयार करते वेळी रस्ता सुधारण्याचे काम IRC-७३-२०१५ मानका प्रमाणे केल्यास उपलब्ध नियोजना पेक्षा लागणारा जास्त खर्च, वळणे व चढ उतार सुधारणा करण्यासाठी लागणारी अतिरिक्त जमीन व तिच्या भूसंपादनाचा खर्च तसेच भूसंपादना बाबतचा जनतेचा रोष टाळण्यासाठी शासनाने सदर काम अस्तित्वातील जमिनीच्या रुंदीत वाहन वेगमर्यादा नियंत्रित करुन काम करावे अशी मार्गदर्शक सूचना शासन परिपत्रक क्र.योजना-२०१६/प्र.क्र.१६५/नियोजन-१अ, दि.३/५/२०१७ नुसार दिलेल्या होत्या. त्यानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला. तसेच निधी अभावी काही मोठ्या व छोट्या पुलाचे रुंदीकरण करण्याच्या कामाचा समावेश करता आला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्याकडून मागील तीन वर्षात मंजूर करण्यात आलेल्या इमारत दुरुस्तीच्या कामांबाबत

**(२८) ११४८९ (१९-०९-२०२०). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्याकडून लेखाशीर्ष २०५९ अंतर्गत इमारत दुरुस्तीकरिता मागील तीन वर्षात किती कामे मंजूर करण्यात आली आहेत याबाबतची माहिती मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे मागितली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजूर करण्यात आलेल्या कामांची त्या ठिकाणी आवश्यकता होती काय तसेच याबाबत संबंधित कार्यालयाकडे तशी कोणी लेखी मागणी केलेली होती काय,

(३) असल्यास, सदर कामाची निविदा (टेंडर) कोणत्या पद्धतीने करण्यात आले व किती कामांची निविदा स्वीकारण्यात आली व किती नाकारण्यात आली व ती नाकारण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर कामाची सद्य:स्थिती काय व कामावर किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(५) असल्यास, सदर कामांमध्ये गैरप्रकार झालेला असल्यास त्याच्या चौकशीकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीच्या अध्यक्षतेखाली वा अन्य तज्ञांसह चौकशी समिती नेमण्यात येणार आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे. यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे.
(२) उपभोक्ता खात्याकडील मागणी व क्षेत्रीय अधिकाऱ्यांने वेळोवेळी केलेल्या पाहणीनुसार, कामांची निकड लक्षात घेऊन कामे मंजूर करण्यात आली आहे.
(३) शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या निकषांनुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन लेखाशीर्ष २०५९ अंतर्गत सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या ३ वर्षात १५३ निविदांचे कार्यारंभ आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत.
(४) सद्यस्थितीत सर्व मंजूर कामे पुर्ण असून सदर कामांवर मागील ३ वर्षात रु.२९३२ लक्ष इतका खर्च झालेला आहे.
(५) सदर कामामध्ये कोणताही गैरप्रकार झाला नाही तसेच याबाबत कोणत्याही तक्रारी किंवा आक्षेप प्राप्त झाले नसल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत महानगरपालिकेकडून करण्यात येणाऱ्या वृक्ष छाटणीबाबत**

**(२९) ११५५५ (१८-०९-२०२०). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दादर येथील जी/उत्तर विभागातील फांद्याछाटणी बद्दल आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे नागरिकांकडून तक्रार दाखल झाली असून ही वृक्ष छाटणी नसून झाडांची कत्तल असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत महानगरपालिकेकडून वृक्ष छाटणी ही इलेक्ट्रिक करवतीच्या सहाय्याने होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वृक्ष छाटणीच्या वेळी तांत्रिक ज्ञान नसलेल्या कर्मचाऱ्यांवर छाटणीची संपूर्ण जबाबदारी सोपविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार अशा प्रकारच्या अमानुष वृक्ष छाटणी करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२०) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/उतर विभागातील पावसाळापूर्व व पावसाळादरम्यान नियमित स्वरुपात झाडांच्या फांद्यांची छाटणी करतांना बृहन्मुंबई महानगरपालिकेस काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या हे खरे आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मृत वा धोकादायक वृक्ष/फांद्यांच्या छाटणीची कामे ही झाड/फांद्या पडून होणारी अप्रिय घटना/दुर्घटना तसेच जीवित तथा वित्तहानी टाळण्याकरिता महानगरपालिकेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या ठेकेदारामार्फत, त्याच्याकडील तांत्रिकदृष्टया सक्षम अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षण/मार्गदर्शन व सूचनेनुसार करण्यात येतात.

सदर छाटणीची कामे करतांना इलेक्ट्रिक करवतीच्या सहाय्याने अथवा इतर तत्सम अवजारे इत्यादींचा वापर झाडाच्या आवश्यकतेनुसार व संभाव्य जीवित हानी व धोका टाळण्याकरिता केला जातो.

त्यानुसार जी/उत्तर विभागातील केवळ असंतुलित, रोगग्रस्त, झुकलेल्या फांद्या तसेच मृत व धोकादायक वृक्ष यांचीच छाटणी करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडवरील मंडाळा परिसरात लागलेल्या आगीत गोदामे जळल्याबाबत**

**(३०) ११६०१ (१०-०७-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडवरील मंडाळा परिसरात लागलेल्या भीषण आगीत १५ ते २० गोदामे पूर्णपणे जळून राख झाल्याची दुर्घटना घडल्याचे दिनांक २४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २० ते २५ वर्षापासून मानखुर्द मंडाळा येथील जिल्हाधिकाऱ्यांच्या भूखंडावर रसायने, लाकूड आणि चिंध्या अशा वस्तूंची दीडशेपेक्षा अधिक गोदामे असून अनेक गोदामे बेकायदा असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर प्रकरणी संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२०) :** (१) घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड येथील मंडाला परिसरात असलेल्या १३ विविध बैठ्या गाळ्यांमध्ये व काही गाळ्यांतील पोट माळ्यांमध्ये दिनांक २३ जून, २०२० रोजी आग लागली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर आगीची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असता, सदर आगीचे संभाव्य कारण “सदोष विद्युत प्रणाली” असे आढळून आले.

सदर परिसरातील अनधिकृत गोदामांवर उपजिल्हाधिकारी (चेंबूर) यांचेमार्फत वेळोवेळी निष्कासनाची कारवाई केली जाते.

तसेच, अनधिकृत गोदामांच्या संबंधित व्यवसायिकांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४/४७१ अन्वये कारवाई करुन मा.दंडाधिकारी न्यायालयात खटले दाखल करण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पीसीएमसी व पीएमसी अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन होत असून निर्माण होणाऱ्या टीडीआर संबंधित महानगरपालिका क्षेत्रातच वापरण्यास परवानगी देण्याबाबत**

**(३१) ११६१७ (१७-०९-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी विकास प्राधिकरण पुणे पिंपरी-चिंचवड एस आर ए यांच्यावतीने झोपडपट्टी विकास नियमावली मंजूर होणेबाबतच्या सूचना गृहनिर्माण विभागाकडे प्रस्तावित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीसीएमसी पीएमसी डीसीआर अंतर्गत विकसित झालेल्या कोणत्याही प्राप्त भूखंडावर झोपडपट्टीचा टीडीआर अनिवार्य आणि प्राधान्य वापर २० टक्के ऐवजी ३० टक्के करण्याचे सूचित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन होऊन निर्माण होणारा टीडीआरचे प्रमाणपत्राचा वापर पीसीएमसी पीएमसी पीएमआरडीए येथे सर्व प्रकारचे चलन भरून वापरण्यास परवानगी देण्याबाबत सुचविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण याचा टीडीआर इतर महानगरपालिका क्षेत्रात व पीएमआरडीए क्षेत्रात वापरण्यास परवानगी दिल्यास पीसीएमसी शहरातील ३७ घोषित व ३४ घोषित अशा एकूण ७१ झोपडपट्टीत राहणाऱ्या लाखो नागरिकांचे जीवनमान उंचविण्यासाठी अडथळा निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उद्योग नगरी पिंपरी चिंचवड शहरात इतर क्षेत्रातील टीडीआर वापरण्यास परवानगी दिल्यास शहरातील अस्तित्वात असलेल्या झोपडपट्ट्यांचा विकास प्रलंबित राहून शहराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन शहरातील झोपडपट्टी निर्मूलन करण्यास अपयश येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मा.लोकप्रतिनिधी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील टीडीआर शहरातच वापरण्यासाठी प्रयत्न करावे व इतर भागातील टीडीआर पीसीएमसी शहरात वापरण्यास प्रतिबंध करावा अशी मागणी लेखी पत्राद्वारे मा.मुख्यमंत्री व मा.गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे माहे मार्च च्या पहिल्या आठवड्यात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, इतर शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील उत्पन्न होणारा टीडीआर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात वापरण्यास प्रतिबंध करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड (१९-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे साठीचे सर्वसाधारण झोपडपट्टी योजना सुधारणेच्या नियमावलीमध्ये (कलम-३ब) पीसीएमसी पीएमसी डीसीआर अंतर्गत विकसित झालेल्या कोणत्याही प्राप्त भूखंडावर झोपडपट्टीचा टीडीआर अनिवार्य असून सदर पीसीएमसी पीएमसी डीसीआर भूखंडावर २०% वापर ऐवजी ३३% वापर प्रस्तावित करण्यात आलेला आहे.
(३) (४) व (५) सद्य:स्थितीत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून निर्माण होणा-या टी.डी.आर. च्या वापरावर २० टक्के कमाल मर्यादा लागू आहे. तसेच पीसीएमसी, पीएमसी व पीएमआरडीए या क्षेत्रात निर्माण होणारा टीडीआर हा ज्या त्या महानगरपालिकेच्या हद्दीपर्यंतच वापराबाबत मर्यादीत आहे.तसेच शासनाकडे सदर (कलम ३ब) मध्ये एका स्थानिक प्राधिकरणाकडील टी.डी.आर अन्य स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात वापरण्याबाबत तरतूद नमूद नाही.
(६) नाही, हे खरे नाही.
(७) व (८) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया, गोरेगांव राज्य महामार्गावरील रस्त्याच्या बांधकामात अनियमितता होत असल्याबाबत**

**(३२) ११६२१ (१७-०९-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) गोंदिया, गोरेगांव राज्य महामार्गावरील रस्त्याच्या बांधकामात कंत्राटदाराने नियम डावलून रस्त्याचे विकासकाम प्रलंबित ठेवले असल्याने या परिसरामधील नागरीकांमध्ये आरोग्य समस्यांची भितीही निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन कोणत्याही उपाययोजना न करता दोन वर्षापासुन १० किलोमीटर रस्त्याचे बांधकाम सुरु आहे तसेच रस्त्यावरच्या पुलाचे बांधकामही अर्धवट असुन याकडे संबंधित सार्वजनीक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी दखल घेऊन शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधित रस्ताविकास कंत्राटदारावर कारवाई तसेच सदरहु प्रलंबित बांधकाम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२५-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

सदर रस्त्याच्या बांधकामाच्या व पूलाच्या ठिकाणी आवश्यक ठिकाणी सूचना फलक, चेतावणी फलक व सुरक्षा रिबिन वेळोवेळी लावण्यात येऊन आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच सदर रस्त्यावरील पूल पावसाळयापूर्वी पूर्ण करणे नियोजित होते. परंतु कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे कामाच्या गतीवर परिणाम झालेला आहे. सद्यस्थितीत दोन्ही पूलांची कामे पूर्ण झाली असून त्यावरुन वाहतूक सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, ही बाब खरी नाही.

(३) सदर काम मानकाप्रमाणे होत असल्याची खात्री प्राधिकृत अभियंता यांचे मार्फत होत आहे व विभागाचे सुद्धा त्यावर नियंत्रण आहे. या प्रकरणी कामाचा दर्जा योग्य होत असल्याने चौकशीची आवश्यकता भासली नाही. त्याचप्रमाणे कंत्राटदाराच्या संथ गतीमुळे कामाच्या मूळ कालावधीतील भाववाढ निर्देशांक गोठविण्यात आलेले आहेत.

रस्त्याच्या एकूण १४.४० कि.मी. लांबीपैकी ११.२० कि.मी.लांबीचे दुपदरीकरणाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे व ३.२० कि.मी.लांबीचे शहरी भागातील चौपदरीकरणाचे काम सुरु करण्यात आले असून सदर संपूर्ण काम मार्च २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेने चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून कार्यरत असणाऱ्या परराज्यातील नागरिकांची पदोन्नती केल्याबाबत

**(३३) ११९४७ (१७-०९-२०२०). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेत चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या परराज्यातील व्यक्तींना पदोन्नती दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना परराज्यातील स्वायत्त विद्यापीठाच्या प्रमाणपत्राच्या आधारावर पदोन्नती दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परराज्यातील विद्यापीठांना महाराष्ट्रात पदवी देण्याचा अधिकार आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार पुणे महानगरपालिकेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदोन्नती नियमबाह्य असल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-११-२०२०) :** (१) व (२) • पुणे महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार वर्ग ३ व ४ मधील कार्यरत कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने नेमणूक देण्यात येते.

• त्यानुसार परराज्यातील विद्यापीठांचे प्रमाणपत्र सादर केलेल्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना ते पात्र आढळून आल्याने पदोन्नती दिलेली आहे, हे खरे आहे.
(३) व (४) • याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, आदेश तसेच पुणे महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश नियमास अनुसरुन परराज्यातील विद्यापिठांची प्रमाणपत्रे ग्राह्य धरुन पदोन्नत्या देण्यात आले असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी कोरोना बाधित होत असल्याबाबत**

**(३४) १२०५५ (१८-०९-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेत कोरोनाची लागण होणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांची संख्या वाढतच असून १७८७ कर्मचारी व अधिकाऱ्यांना कोरोनाची लागण झाली आहे तर ७५ कर्मचारी व अधिकाऱ्यांचा कोरोनामुळे मृत्यू झाला असल्याची गंभीर बाब दिनांक २३ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना रुग्ण आढळलेल्या इमारती सील करणे, रुग्ण शोधणे, प्रतिबंधित क्षेत्र तयार करणे, अन्नवाटप, रुग्णांचे अहवाल तयार करणे आदी कामे महानगरपालिकेचे कामगार आणि अधिकारी करीत असल्याने कोरोना होण्याचा धोका उद्भवत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनातर्फे चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार कोणती उपययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) कोविड आजार विषाणु स्वरुपात श्वसनाद्वारे पसरणारा असल्यामुळे तसेच, मुंबईची दाट लोकसंख्या, झोपडपट्टी व तत्सम वस्तीची घनता यामुळे मुंबईतील सर्व नागरिक या आजाराकरिता अतिजोखमीच्या गटात येतात.

परंतु बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कामगार आणि अधिकारी प्रत्यक्षात रुग्णांच्या संसर्गात येत असल्यामुळे त्यांना कोरोना होण्याचा धोका उद्भवणे शक्य असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाधीत कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेमार्फत अलगीकरण, विलगीकरण सेवा व उपचार दिले जातात.

तसेच, कोविड-१९ च्या बाधीत रुग्णांसाठी कर्तव्य बजावतांना मृत पावलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यास प्रधानमंत्री योजनेंतर्गत अटी व शर्तीनुसार कामाच्या अनुषंगाने रु.५० लाख इतके सानुग्रह सहाय्य घोषित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दिघा इलठणपाडा (नवी मुंबई) येथील मोगली धरण नवी मुंबई महानगरपालिकेस भाडेतत्वावर हस्तांतरित करणेबाबत**

**(३५) १२१४३ (२०-०९-२०२०). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील दिघा परिसरातील जुना इलठणपाडा येथील १५० वर्षापूर्वीच्या ब्रिटीशकालीन धरणाची देखभाल व दुरुस्तीअभावी अत्यंत दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धरणाची दुरुस्ती न केल्यास धरण फुटून परिसरातील वसाहतीला केव्हाही धोका निर्माण होऊ शकतो याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर धरणाच्या डागडुजी व दुरुस्तीसाठी धरण नवी मुंबई महानगरपालिकेकडे नाममात्र दराने दिर्घकालीन भाडेपट्ट्याने हस्तांतरित करून मिळावे म्हणून लोकप्रतिनिधीनी रेल्वे प्रशासनाकडे तसेच शासनास माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२०) :** (१) व (२) • नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दिघा परिसरात जुना इलठणपाडा क्षेत्रात रेल्वे प्रशासनाच्या मालकीचे ब्रिटीशकालीन धरण आहे.

• सदर धरणाची दुरूस्ती रेल्वे प्रशासनामार्फत करण्यात येते.

• सदर धरणाच्या भिंतीला तडे गेले असल्याने त्याची दुरूस्ती करण्यासाठी महानगरपालिकेने रेल्वे प्रशासनाला कळविले आहे.

(३) व (४) • सदर धरण नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत मा. लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे.

• सदर धरण नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्यासाठी रेल्वेकडे महानगरपालिकेच्या वतीने पाठपुरावा सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) शहरातील नागरी वस्तीमध्ये जनावरांची अवैध कत्तल केली जात असल्याबाबत**

**(३६) १२२२२ (१८-०९-२०२०). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) शहरातील नागरी वस्तीमध्ये जनावरांची अवैध कत्तल केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद शहरातील नागरी वस्ती मधील जनावरांच्या अवैध कत्तलखान्याच्या दुर्गंधीमुळे नागरीकांना अत्यंत त्रास होत असून उघड्यावर असलेल्या मांसामुळे अनेक रोगांचाही सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उस्मानाबाद शहरातील नागरी वस्तीमध्ये जनावरांची उघड्यावर अवैध कत्तल होत असतांना ती बंद करणेसाठी जिल्हाधिकारी उस्मानाबाद, जिल्हा पोलीस अधिक्षक उस्मानाबाद व नगर परिषद प्रशासन उस्मानाबाद यांनी अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या आहेत,
(४) असल्यास, या प्रकरणी दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.
परंतु जनावरांच्या अवैध कत्तलीसंदर्भात तक्रार प्राप्त होताच कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.
(२) हे खरे नाही.
(३) उस्मानाबाद शहरातील नागरी वस्तीमध्ये जनावरांची उघड्यावर होत असलेल्या अवैध कत्तलीसंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने, पोलिस स्टेशन उस्मानाबाद शहर अंतर्गत संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र पोलिस अधिनियमाप्रमाणे खटले दाखल करुन प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.
• सदर प्रकरणी पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी उस्मानाबाद शहर, आनंदनगर व उपविभागीय पोलिस अधिकारी उस्मानाबाद यांना वेळीच कायदेशीर कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
• अवैध कत्तल होत असलेल्या भागात विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी अहवाल सादर केला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिर्डी (जि.अहमदनगर) येथील बायपास रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत**

**(३७) १२३३० (१९-०९-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिर्डीत (जि.अहमदनगर) होणारी अवजड वाहतूकीची कोंडी, होणारे अपघात टाळण्यासाठी निर्मळ-पिंपरीने-निमगाव अशा २३ कि.मी. च्या शिर्डी बायपासचे काम पहिल्या ठेकेदाराने अर्धवट सोडून दिल्यानंतर आलेल्या दुस-या ठेकेदाराने रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केले असून गाव रस्त्यांचे रुंदीकरण करुन त्यावर डांबर टाकण्याचे काम केल्यामुळे रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच रस्त्यालगत शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाची उभारणी झाली असल्याने रस्त्याचे महत्व वाढले असुन बायपास रस्त्यावरील गावकऱ्यांनी दुकाने, हॉटेल सुरु केली असुन ट्रकचालक, विमानतळाकडे जाणारे साईभक्त यामुळे या रस्त्यावरील रहदारीत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बायपासचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने रस्त्याच्या निर्मितीनंतर काही महिन्यातच रस्त्याची दुरवस्था झाली असून मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनधारक या रस्त्याने वाहतूक करण्यास टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित ठेकेदारावर कारवाई तसेच रस्त्याची पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२५-११-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शिर्डी राहता बाह्यवळण रस्ता या २३ कि.मी. (प्रत्यक्षात २२ कि.मी.) लांबीच्या दुपदरी रस्त्याचे काम कोपरगाव ते कोल्हार ७८/२०० ते १२०/०० या रस्त्याचे चौपदरीकरण करणे या खाजगीकरणांतर्गत हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पाचा भाग आहे. सदर काम सन २००७ मध्ये मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचेमार्फत करण्यात येत होते. परंतु उद्योजकाने साधारणत: ३९% इतके काम करुन मे, २०१० मध्ये पुढील काम थांबविले होते. तसेच अग्रणी बँक युको बँक ऑफ इंडिया यांचेतर्फे उद्योजक मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर यांना Defaulter घोषीत करुन उर्वरीत काम द्वितीय उद्योजक मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि.मुंबई यांना शासन निर्णय क्र.खाक्षेस-२००५/प्र.क्र.१९५/रस्ते-९, दिनांक २७.०७.२०११ अन्वये हस्तांतरीत करण्यात आले होते. मे.सुप्रिम यांना जा.क्र./एबी/३४३/२०१४, दि.३.३.२०१४ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आला.

परंतु मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर या उद्योजकानेही शिर्डी बाह्यवळण रस्त्याचे केवळ ०/००० ते ६/२०० व २१/०० ते २२/०० या लांबीत डांबरीकरणाचे (SDBC पर्यंत) व ६/२०० ते ८/४०० DBM पर्यंतचे काम पूर्ण करुन इतर लांबीतील काम करणे बंद केले. याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करुनही उद्योजकाने काम पूर्ण न केल्याने शासनाचे आदेशान्वये उर्वरित लांबीतील (१४.८ कि.मी.) काम उद्योजकाच्या जबाबदारी व खर्चाने (Risk and Cost) पूर्ण करण्यात आलेले असून सदर लांबी सुस्थितीत आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

उद्योजकामार्फत करण्यात आलेली कि.मी.०/०० ते ६/२०० व २१/०० ते २२/०० हा रस्ता क्षतीग्रस्त झाल्याने या खराब लांबीच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाचे रु. १५.०० कोटीचे काम सन २०२० च्या अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आले.
(४) कि.मी.०/०० ते ६/२०० व २१/०० ते २२/०० या लांबीची व कोपरगाव कोल्हार कि.मी.७८/२०० ते १२/०० या लांबीची देखभाल दुरुस्ती व नुतणीकरण उद्योजक करीत नसल्याने शासन पत्र क्र.खाक्षेस-२००५/प्र.क्र.१९३ (एल.बी.६)/रस्ते-९, दिनांक १२.१२.२०१९ अन्वये उद्योजकाची पथकर वसुली बंद करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत कि.मी.०/०० ते ६/२०० व २१/०० ते २२/०० या खराब लांबीच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाचे रु. १५.०० कोटीचे काम सन २०२० च्या अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आले आहे.

तथापि वित्त विभागाच्या दिनांक ०४.०५.२०२० च्या शासन निर्णयानुसार कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तिय वर्षात होणा-या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्याच्या शासन निर्णयाच्या अधिन राहून योग्य वेळी सदरचे काम हाती घेण्यात येईल.

(५) लागू नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) येथे नवीन शासकीय विश्रामगृह बांधण्याबाबत**

**(३८) १२५४८ (१९-०९-२०२०). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथे असलेल्या शासकीय विश्रामगृहात केवळ ४ कक्षबंध आहेत, सदर कक्ष हे शासकीय अधिकारी, खासदार व आमदार यांच्याकरीता अपुरे पडत असून सदर विश्रामगृहाच्या बांधकामास तडे जाऊन ते जीर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण येथे नवीन शासकीय विश्रामगृह बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) अतिरिक्त दोन कक्ष तयार करण्याचा प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावर तयार करण्यात येत असून त्याबाबत निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत नागरिकांना विना तपासणी कोरोना चाचणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येत असल्याबाबत**

**(३९) १२८२० (२०-०९-२०२०). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना टाळेबंदीचा गैरफायदा घेऊन नागरीकांची फसवणूक करुन त्यांची शारिरीक तपासणी न करता त्यांना प्रयोगशाळेत कोरोना चाचणीसाठी चिठ्ठी (प्रिस्क्रिप्शन) दिल्याच्या घटना मुंबई

मध्ये घडत असल्याची बाब दिनांक २० मे, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले आहे व तद्नुसार या डॉक्टरांविरुद्ध मुंबई महानगरपालिकेने कोणती वा किती डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२०) :** (१) याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## करोनाग्रस्तांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी सात परिमंडळावर सात अतिरिक्त आयुक्तांची नेमणूक केल्याबाबत

**(४०) १३३७८ (२०-०९-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत टाळेबंदी कालावधीत करोनाग्रस्तांची संख्या झपाट्याने वाढत असून १७ हजाराहून अधिक झाल्याने, करोनाग्रस्तांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी मुंबई महानगरपालिका आयुक्त यांनी सात परिमंडळावर सात अतिरिक्त आयुक्तांची दिनांक १० मे, २०२० रोजी वा त्यासुमारास नेमणूक केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १० जून, २०२० रोजीपर्यंत मुंबईत केलेल्या उपाययोजनेनुसार करोनाग्रस्तांच्या संख्येत किती प्रमाणात घट झालेली आहे,
(३) असल्यास, मुंबई सुरळीत सुरु करण्याच्या दृष्टीने शासनातर्फे निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) मुंबईत करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे कोविड-१९ च्या रुग्णांचा वाढ दुप्पट होण्याचा दर ८७ दिवसांपर्यंत वाढला असून, रुग्णांच्या संख्येची वाढ होण्याची स्थिती मंदावली आहे.

माहे मे २०२० मध्ये कोरोनाचे ३३,१४५ तर माहे ऑगस्ट २०२० मध्ये ३०,३३९ इतके रुग्ण आढळून आले आहेत.
(३) "चेस द व्हायरस" या पॉलिसी अंतर्गत कोरोना-१९ या आजारावर नियंत्रण आणण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे विविध कार्यपध्दती अवलंबविण्यात आल्या आहेत:

**• फ्लू सदृश लक्षणे असलेले रुग्ण घरोघरी भेट देऊन त्वरेने शोधणे**

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २४ विभागांमध्ये आरोग्य कर्मचारी व आरोग्य स्वयंसेविका यांची सुमारे १ हजार पथके झोपडपट्टी सदृश वस्तीत रोज घरोघरी भेट देऊन दररोज ६ ते ७ लाख लोकांचे सर्वेक्षण करीत आहेत.

**• कोविड रुग्णाच्या नजीक संपर्कातील व्यक्तींची तपासणी**

झोपडपट्टी सदृश वस्तीमध्ये कोविड रुग्णांच्या नजीकच्या संपर्कातील व्यक्तींना कोविड आजार होण्याची संभावना असल्यामुळे त्यांचे अतिजोखमीच्या व्यक्ती म्हणून सर्वेक्षण केले जाते व त्यांना कोरोना काळजी केंद्र (CCC१) येथे अलगीकरणात ठेवले जाते.

सद्य:स्थितीत २४ विभागांत एकूण ५०,०७७ खाटांच्या विविध CCC१ संस्था कार्यरत आहेत.

**• उपचार**

सौम्य लक्षणे असलेले तसेच लक्षणे नसलेल्या कोरोना पॉझिटीव्ह रुग्णांना CCC२ मध्ये दाखल करुन उपचार केले जातात.

सद्य:स्थितीत २४ विभागांत एकूण २३,९५५ खाटांच्या विविध CCC२ संस्था कार्यरत आहेत.

कोविड-१९ आजाराचे मध्यम किंवा तीव्र स्वरुप तसेच इतर आजारबाधीत कोविड रुग्णांसाठी अधिकाधिक खाटा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न सुरु आहे.

**• SPO२ सर्वेक्षण**

कोविड-१९ चा धोका लक्षात घेता मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग, किडनीचे आजार व दमा असे आजार असलेले व ज्येष्ठ नागरिक यांचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले जाते. सदर रुग्णांना त्यांची औषधे नियमितपणे घेत असल्याची खातरजमा करुन व ती नियमितपणे घेण्यासाठी सल्ला दिला जातो.

या सर्वेक्षणादरम्यान त्यांची ऑक्सिजन पातळी तपासण्यात येते. ऑक्सिजन पातळी कमी आढळून आल्यास त्यांना जवळच्या महानगरपालिकेच्या नॉन कोविड रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेविकांच्या मानधनात वाढ होणेबाबत**

**(४१) १३३८७ (२०-०९-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत करोनाच्या संकटकाळात घरोघरी जाऊन आरोग्य तपासणी करणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेविकांना महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्या मानधनात माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पूर्वलक्षी प्रभावाने चार हजार रुपयांची वाढ करुन माहे मे, २०२० च्या पहिल्या आठवड्यात देण्याचे जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ३७०९ आरोग्य सेविकांना शासनाने महानगरपालिकेमार्फत मागील ७ महिन्याच्या थकबाकीसह वाढीव मानधन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रातील स्वयंसेविकांचे मानधन वाढीबाबत होत असलेल्या मागणीस अनुसरुन त्यांचे मानधन स्थायी समिती/महानगरपालिकेच्या मंजुरीसापेक्ष दरमाह रु. ५०००/- वरुन दरमाह रु. ९०००/- करण्यात आले आहे.

सदर वाढ माहे सप्टेंबर २०१९ पासून लागू करण्यात आली आहे तसेच थकबाकीसह वाढीव मानधन अधिदान माहे मे, २०२० मध्ये अदा करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत महिला आरोग्य स्वयंसेविकांना दरमाह रु.९०००/- प्रमाणे नियमित मानधन देण्यात येते.

---

**जिंतुर (जि.परभणी) नगरपरिषद कार्यालयात रोजंदारीवर काम करणाऱ्या २० जणांची नियुक्ती बेकायदेशीरपणे केल्याबाबत**

**(४२) १३४५७ (२०-०९-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतुर (जि.परभणी) नगरपरिषद कार्यालयात ६ महिन्यांपासून रोजंदारीवर काम करीत असलेल्या २० जणांची नियुक्ती बेकायदेशीरपणे करण्यात आली असून त्यांच्या पगारावर लाखो रुपये खर्च होत असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरपरिषद कार्यालयात रोजंदारी कामावर कर्मचारी नियुक्त करण्यासाठी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव पारित करून नंतर जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेऊन रोजंदारी कर्मचारी नियुक्त करता येतात परंतु अशी कोणतीही प्रक्रिया राबवली गेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.

जिंतूर नगरपरिषदेच्या विविध विभागात कंत्राटी पद्धतीने १२ कर्मचारी मानधन तत्वावर कार्यरत आहेत.
(२) व (३) सदर नियुक्तीस जिंतूर नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजूरी घेण्यात आली असून, जिल्हाधिकारी कार्यालयाची मंजूरी घेण्यात आलेली नाही, ही बाब खरी आहे.

सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, सेलू यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, सदर चौकशी अहवाल प्राप्त होताच संबंधितांविरुद्ध नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असल्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी अहवाल सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्सोवा (मुंबई) के वॉर्ड येथील युनानी व काळसेकर रुग्णालय ताब्यात घेण्याबाबत

**(४३) १३५३७ (२०-०९-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्सोवा (मुंबई) के वॉर्ड येथील कोळीवाड्यात कोरोना संक्रमीत रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून मुंबई महानगरपालिकेने सदर भागातील युनानी व काळसेकर रुग्णालय ताब्यात घेतले नसल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागातील अंजुमन-ए -इस्लाम ट्रस्टचे युनानी मेडिकल कॉलेज व काळसेकर रुग्णालय ही १०० टक्के शासनाच्या अनुदानावर चालत असून उक्त दोन्ही रुग्णालये ताब्यात घेण्याचे महानगरपालिकेने दिनांक ९ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास आदेश काढले असतांना देखील काही वरिष्ठांच्या दबावामुळे अद्यापपर्यंत सदरची रुग्णालये ताब्यात घेतली गेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन सदरची रुग्णालये ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-११-२०२०) :** (१) व (२) मुंबई येथील वर्सोवा भागातील अंजुमन-ए-इस्लाम ट्रस्टचे युनानी मेडिकल कॉलेज व काळसेकर रुग्णालय कोविड-१९ करिता ताब्यात घेण्याचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०९.०५.२०२० व दिनांक २८.०५.२०२० रोजी काढण्यात आले होते.

तथापि सदर ठिकाणी मेडिकल परीक्षेचे सेंटर प्रस्तावित असल्याने सदर दोन्ही रुग्णालये ताब्यात घेण्यात आली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) अशा प्रकारचे निवेदन आढळून आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दादर पूर्व व दादर पश्चिमेला (मुंबई) जोडणारा टिळक पुलाची दुरुस्ती करणेबाबत

**(४४) १३५७० (२०-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर येथील दादर पूर्व व दादर पश्चिमेला जोडणारा टिळक पुलाची दूरवस्था झाल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पुलाच्या संरचनात्मक दुरुस्ती करणे, भेगा भरणे व पुनर्बांधणी करणे इत्यादी कामांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२०) :** (१) आय.आय.टी. मुंबई यांच्या अहवालानुसार सदर पुलाच्या तात्काळ दुरुस्तीचे काम करणे व दिर्घकालीन उपाययोजना करण्याचे सुचविण्यात आले आहे.

(२) व (३) आय.आय.टी. मुंबई यांनी सुचविल्यानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नेमण्यात आलेल्या कंत्राटदारामार्फत सदर पुलाच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर असून ते माहे डिसेंबर, २०२० पर्यंत व महानगरपालिकेच्या हद्दीतील पुलाच्या दुरुस्तीचे काम माहे ऑक्टोबर, २०२० पूर्ण होणे अपेक्षित आहे.

रेल्वेच्या हद्दीतील पुलाची दुरुस्ती करण्याचे काम मध्य व पश्चिम रेल्वेमार्फत करण्यात येत आहे.

तसेच, सदर पुलाच्या दिर्घकालीन उपायांकरिता सदर पुलाची पुनर्बांधणी महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. (राज्य शासन व रेल्वे मंत्रालय यांचा संयुक्त उपक्रम) या संस्थेकडून करण्याचे नियोजित असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**कमळापूर-रामापूर (जि.सांगली) पुलाची दुरुस्ती करणेबाबत**

**(४५) १३६२३ (१९-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील कमळापूर-रामापूर पुलाची मागणी सातत्याने पत्राद्वारे मा.स्थानिक लोकप्रतिनिधी हे शासनाकडे करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलासंदर्भात सातत्याने मागणी करुनही अद्याप कमळापूर-रामापूर पूल होण्याबाबत कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार शासनाने सदर पुलाकरिता निधीची तरतूद करुन पुलाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. सदर पुलाचे दुरुस्ती कार्याक्रमांतर्गत दि.१.०१.२०२० च्या पत्रान्वये रु.३० लक्ष इतक्या किंमतीचे मंजूर काम पुर्ण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत पुल वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

मोठ्या पुलाचे बांधकाम करण्याचे काम हे निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबड (ता.अंबड, जि.जालना) नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांनी बनावट स्वाक्षरी करून लाखो रुपयांचे धनादेश अदा केल्याबाबत**

**(४६) १४४६८ (२०-०९-२०२०). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड (ता.अंबड, जि.जालना) नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांनी नमुना नं.६४ वर नगराध्यक्षा यांची बनावट स्वाक्षरी करून लाखो रुपयांचे धनादेश अदा केल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (बदनापूर-अंबड) यांनी मा.नगरविकास मंत्री यांना दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले आहे व तद्नुसार शासनाने सदर मुख्याधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२०) :** (१) अशा आशयाचे निवेदन माहे सप्टेंबर, २०२० मध्ये प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(२) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, जालना यांना स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवीमुंबई मधील १६३१ इमारतींना फायर एनओसी नसल्याबाबत**

**(४७) १४५५४ (१७-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व नवी मुंबई शहरात आगीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असताना नवी मुंबई मधील १६३१ इमारतींना फायर एनओसीच नसल्याची धक्कादायक माहिती मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारतींमध्ये आग विझविण्यासाठी लागणारी साधनेही नादुरुस्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू इमारतींवर तातडीने कारवाई करून फायर एनओसी व आग विझविण्याची साधने बंधनकारक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-११-२०२०) :** (१) • नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत आतापर्यंत १८७० विविध प्रकारच्या इमारती/आस्थापनांना फायर एनओसी देण्यात आलेली आहे.

• तथापि, कोविड-१९ सारख्या महारोगाच्या प्रादुर्भावामुळे इमारतींना देण्यात आलेले ना-हरकत दाखले नुतनीकरण करण्याची कार्यवाही पुर्णत: बंद स्थितीत होती.

• सद्यस्थितीत इमारतींना फायर एनओसी देण्याबाबतची कार्यवाही पुर्ववत सुरू करण्यात आलेली आहे.

(२) व (३) • इमारती/आस्थापनांमध्ये बसविण्यात आलेली कायमस्वरूपी आग विझविण्याची यंत्रणा सुस्थितीत व कार्यान्वित ठेवण्याची जबाबदारी, महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ मधील कलम ३(३) नुसार इमारत भोगवटाधारक/मालक यांची आहे.

• संस्था / आस्थापना / इमारतधारक/ को.ऑ. हौ. सोसायटी यांनी माहे जानेवारी व जुलै मध्ये महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालक यांचे मान्यताप्राप्त लायसन्स अभिकरणाकडील “ब” प्रमाणपत्र महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

• “ब” प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित इमारतींचा वीज पुरवठा व पाणी नळ जोडणी खंडीत केल्यानंतरही अग्निशमन यंत्रणा संबंधित बाबींची पुर्तता न केल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात येते.

• सीवूड्स् येथील सी होम्स या सोसायटीच्या कार्यकारणीवर दि.२८.०२.२०२० रोजी FIR No. ००७८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

• नवी मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत जनजागृती होण्याच्या उद्देशाने विविध वर्तमानपत्रांमध्ये वेळोवेळी जाहिर आवाहन केल्याचे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा (जि.लातूर) शहरातील स्मशानभूमीतील शेडचे बांधकाम व संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याबाबत

**(४८) १४६५० (२०-०९-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) शहरातील गोपाळपूर रस्ता ते भादा रस्त्याच्या लगत विविध समाजाच्या स्मशानभूमी असून रस्त्याच्या कडेने संरक्षण भिंत बांधकाम करण्याबाबत तसेच त्याठिकाणी असलेल्या ब्राम्हण समाज स्मशानभूमी शेडची दुरवस्था झाल्याने नवीन शेडचे बांधकाम करण्याबाबत जिल्हा वार्षिक योजना निधी किंवा इतर योजनेच्या निधीतून मंजुरी देण्याबाबत औसा तालुका लोकप्रतिनिधी यांनी मा.जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे दिनांक ३० जुन, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने निधी मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी जागेची पाहणी करुन कामाचे सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही औसा नगरपरिषद स्तरावर सुरु असल्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांनी अहवाल सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर (जि.ठाणे) जिल्हा मुख्यालय इमारतीचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४९) १४६५१ (२०-०९-२०२०). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवनिर्मित पालघर जिल्याचे विभाजन दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास करण्यात आले त्यानुषंगाने पालघर जिल्हा मुख्यालयाच्या सुनियोजित विकास करून विविध विभागांतर्गत येणाऱ्या सर्व जिल्हास्तरीय शासकीय कार्यालयांच्या इमारती आणि पायाभूत सुविधा निर्माण करणे यासाठी सिडको लि. यांना सदरचे बांधकाम पूर्ण करण्याचे कंत्राट देण्यात आले होते परंतु नवीन जिल्हा मुख्यालय इमारतीचे बांधकाम प्राधान्याने मुदतीत पूर्ण करणे अपेक्षित असतांना आजतागायत ६ वर्ष होऊनसुद्धा पालघर जिल्हा मुख्यालय इमारतीचे बांधकाम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने १४० कोटी रुपये खर्च करून ४४०-५७.९० हे आर इतकी शासकीय जमीन ताब्यात घेऊन त्यापैकी १०३.५७.९० हे आर हेक्टर जमिनीवर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या इमारतीसह अन्य तीन प्रशासकीय इमारती अशा एकूण पाच इमारती उभारण्याचे काम अद्यापही टाईल्स, मार्बल, प्लास्टर विविध प्रकारच्या कामामुळे अपूर्ण असल्याचे निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जिल्हा मुख्यालय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-११-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

नवीन पालघर जिल्ह्याकरिता सिडकोमार्फत शासकीय जमीन विकसित करुन पालघर जिल्हा मुख्यालय तसेच नवनगर विकसित करण्याबाबत सिडकोची नवनगर विकास प्राधिकरण म्हणून १.१०.२०१६ च्या अधिसूचनेन्वये नेमणुक करण्यात आली आहे. सुमारे ४४४.५७ हे.आर. शासकीय जमिनीपैकी सुमारे १०३.५७ हे.आर. जमीन विकसित करुन त्यावर जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलिस अधीक्षक, जिल्हा परिषद, जिल्हा सत्र न्यायालय व इतर इमारतींचे बांधकाम सिडकोमार्फत करण्यात येत आहे.

प्रथम टप्प्यात जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलिस अधीक्षक, प्रशासकीय इमारत १ व २ ची कामे ३१.०१.२०२० पर्यंत पुर्ण करण्यात आली असून जिल्हा परिषदचे काम सप्टेंबर,

२०२० पर्यंत पूर्ण करण्यात आले आहे. जिल्हा सत्र न्यायालयाच्या बांधकामाबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यामुळे सदर कामाच्या सुधारित ठिकाणास मा.न्यायालयाकडून मान्यता मिळाली आहे.

वरील कार्यालयीन इमारतींच्या बांधकामांमध्ये अंतर्गत सजावट व फर्निचर ही कामे प्रगतीपथावर असून फेब्रुवारी-२०२१ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा (जि.लातूर) शहरातील बागवान समाजाच्या दफनभूमीसाठी जागा देणेबाबत**

**(५०) १४६५२ (२०-०९-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) शहरात बागवान समाज मोठ्या संख्येने असून सदर समाजाच्या अंत्यविधी साठी दफनभूमी नसल्याने अंत्यविधीची गैरसोय होत असल्याने सदर समाजाच्या दफनभूमीसाठी जागा संपादित करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी, औसा विधानसभा यांनी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे दिनांक ३० जुन, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दफनभूमीकरिता भूमी संपादनाबाबत व जागा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) औसा शहरातील (जि.लातूर) बागवान समाज स्मशानभूमीसाठी अद्याप जमिन निश्चिती झालेली नाही. सदर प्रयोजनाकरीता जमिन निश्चित करुन नियमानुसार आवश्यक कार्यवाही प्रस्तावित असल्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.